# माझे सहस्त्रचंद्रदर्शन

प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

काल मी ८० वर्षे पूर्ण केली. आज माझ्या ८१ वर्षाचा पहिला दिवस. सकाळी आम्ही दोघे फिरून परत येत असताना महालेताईंची सून अपर्णा भेटली. तिला माझ्या वाढदिवसाचे वृत्त कळले होते. माझे अभिनंदन करता करता तिंने कुतुहलाने माझे वय विचारले. मी '८० वर्षे पूर्ण' म्हणताच ती आश्चर्याने माझ्या कडे पहात राहिली. एवढे आयुष्य आणि या वयाला माझे चांगले आरोग्य पाहून ती चकित झाली. माझे परत एकदा अभिनंदन करून तिने माझ्या दीर्घायुष्याचे व चांगल्या आरोग्याचे रहस्य विचारले आणि मी माझ्या पत्नीकडे, आशाकडे, लगेचच बोट केले. अपर्णा निघून गेली आणि कालांतराने मी थोडासा विचारात पडलो; माझ्या चांगल्या आरोग्याचे व दीर्घायुष्याचे श्रेय मी माझ्या पत्नीला का दिले? तिला बरे वाटावे म्हणून? का आता ही फॅशनच झाली होती म्हणून? का मला खरोखरीच तसे वाटत होते म्हणून?

तसे पाहिले तर माझी पत्नी - आशा - माझ्या प्रकृतीची काही खास काळजी घेत होती असे बिलकुल नव्हते. मला मधुमेह होता - त्याची औषधे वेळेवर घेणे, पथ्य सांभाळणे, रोज फ़िरायला जाणे हे सर्व काटेकोरपणे सांभाळण्यात तिचा फारसा वाटा नव्हता. उलट मी गोड खाणे कटाक्षाने टाळत असताना ती काही वेळा मला गोड खाण्याचा आग्रह करून - "खा हो थोडे, काही होत नाही" - असे म्हणून मोहात पाडत होती. माझ्या व्यायाम करण्यावरही ती फारशी खूष नव्हती - "किती वेळ चालतो हो तुमचा व्यायाम? आता पुरे करा आणि आधी चहा प्यायला या." माझ्या शुगर कन्ट्रोलवर व नॉर्मल बी. पी. बद्दल ती समाधानी होती पण त्यामध्ये तिच्या मदतीचा किंवा दक्षतेचा भाग फार कमी होता.

तरीसुद्धा तिला श्रेय देण्यात तिला खूष करण्याचाही प्रयत्न नव्हता व तिला टोकण्याचा किंवा चेष्टेचाही हेतू नव्हता. तिला श्रेय देण्यात माझा प्रामाणिक, मनापासूनचा होकार होता. पण वरवर कारण दिसत नसताना माझ्या अंतःकरणाने असा कौल का दिला होता? मी विचारात पडलो.

योगायोगाने पाचच दिवसांनी माझ्या जीवनात, आमच्या दोघांच्या जीवनात एक महत्वाची घटना घडणार आहे; आमच्या दोघांच्या लग्नाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत; आमच्या लग्नाची सुवर्णजयन्ती आहे येत्या बुधवारी. या पन्नास वर्षांचा जीवनपट माझा मनःचक्षु पुढे धावू लागला आणि माझ्या प्रश्नाचे उत्तर मला सापडले. या पन्नास वर्षात आशाने माझ्यावर नितांत, अथांग प्रेम केले. अनेक प्रसंग त्याचे साक्षीरूप आहेत.

मी तिला पाहायला म्हणून त्यांच्या घरी गेलो. तिने मला पाहिले आणि ती माझ्या प्रेमात पडली. साधी, भोळी, निर्व्याज, जुन्या वळणाची, जुन्या संस्कारात वाढलेली आशा माझा होकार येताक्षणीच मनाने माझी झाली. लग्नाच्या वाटेत एक बारीकसे विघ्न येताच ती वेगाने शकुंतलेच्या आवेगाने मला भेटावयास आली आणि तो अडसर दूर झाला. आमचे लग्न ठरले, मुहूर्त निश्चित झाला.

दरम्यान मी एकदा सुरतेहून अहमदाबादला RMS च्या डब्यातून duty वर जात होतो. ती माझा खाण्याचा डबा घेऊन स्टेशनावर आली, डब्यापाशी येऊन थांबली. माझ्या सहकाऱ्यांनी तिच्या आगमनाची वार्ता मला दिली. तिचे अनपेक्षित येणे तिच्या प्रेमाची अव्यक्त कबुली होती. तिचे मुग्ध भाव, शब्दांपेक्षा कृतीतून व्यक्त होणारी तिची प्रीति मला भावली. लग्न होईपर्यंत तिचे भीरू मन आशंकेने भरलेले होते. लग्नाच्या आधल्या दिवशी कल्याणहून दादरच्या कार्यालयात आम्हाला येण्यास थोडा उशीर झाला; ती बिचारी वाट पाहत थांबली होती. माझी आकृती पाहताच तिचा जीव भांड्यात पडला आणि मगच तिला झोप लागली. एखाद्यावर जीव जडणे ही काय भावना असते हे तिने मला जाणवून दिले. ती तिची भावना मला पाहिल्यापासूनच निर्माण झालेली होती. हार गळयात पडल्यानंतरच ती शांत, स्वस्थचित्त झाली होती. तिच्या जीवनाचे इप्सित तिला मिळाले होते. जीवनाचा जोडीदार तिला लाभला होता आणि सर्वस्व झोकून ती माझी झाली होती. भावना तिच्या होत्या पण तिच्या कृतीतून मला त्या जाणवत होत्या.

तिच्या तुलनेने मी बराच प्रौढ [वयाने नव्हे], अनुभवी होतो. वयाच्या १९ व्या वर्षीच घरातून बाहेर पडलो होतो व नोकरी, शिक्षण, स्वतंत्र जीवन स्वतःच्या पायावर उभारत होतो. उच्छंखल होतो, बेजबाबदार, बेलगाम होतो. पण महत्वाकांक्षी होतो; त्यामुळे वाटेवर होतो. तिच्या आधी दोन मुलींनी मला नाकारले होते, का तर माझा पगार कमी होता, फक्त ११५ रूपये! संसार करायचा म्हणजे कमीतकमी ३०० रूपये तरी हवेत, नाही का? त्यांचा युक्तीवाद बरोबर होता पण मी हिणवला गेलो होतो, डिवचला गेलो होतो. नोकरी करता करता शिक्षण घेऊन प्रगतीच्या नवीन दिशा शोधत होतो. आशाने मला आहे तसा स्वीकारले. माझ्या कमी पगाराबद्दल मला कमी लेखले नाही. एवढ्यात संसार कसा करायचा याची खंत वा चिंताही बाळगली नाही. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून ती माझ्या जीवनात आली.

आणि काय आश्चर्य! लग्नानंतर बरोबर ४ महिन्यांनी मी माझी RMS ची रु.११५ ची नोकरी सोडली होती. M.A. होऊन मी इंग्लीशचा प्राध्यापक म्हणून धुळयाच्या कॉलेजमध्ये रुजु झालो होतो, बरोबर ३०० रु. पगारावर. माझी महत्वाकांक्षा पूर्ण करणारी जीवनाची नवीन दिशा मला मिळाली होती. तिची श्रीकृष्णावर नितांत श्रद्धा होती, आहे. त्या परमेश्वरानेच माझी तिच्याशी गाठ जोडली जाताच माझ्यातील ती त्रुटी दूर केली होती. माझा जीवनातील ती भाग्यलक्ष्मी ठरली आणि सातत्याने माझ्या जीवनातील तिची ती भूमिका मला जाणवली आहे. माझी रखडपट्टीची नोकरी तिच्या आगमनाबरोबर संपली, इंग्लीशचा प्राध्यापक होण्याची माझी महत्वाकांक्षा लगेच पूर्ण झाली. आरामाची मानाची वाट मी चोखाळू लागलो.

बेजबाबदार, बेलगाम जीवनाची सवय असल्यामुळे माझ्या कर्मदारिद्र्यामुळे माझ्या जीवनातील तिचे भाग्यलक्ष्मीचे स्थान पहिली २/३ वर्षे मला उमगलेच नाही. सुख, भाग्य, नशीब जवळ असूनही मी लांब भरकटत राहिलो. आमच्या पहिल्या अपत्याच्या - सीमाच्या - आगमनाची चाहूल लागली आणि आमचे सारेच जीवन आंब्याला मोहर लगटावा तसे मोहरून गेले.

धुळे, बारामती, चाळिसगाव - माझ्या प्राध्यापकीची १२ वर्षे भुर्रकन उडून गेली. ३ मुलांच्या आगमनाने आमचे जीवन मोहरून गेले होते. त्यांच्या बाललीला अनुभवता अनुभवता आशाने आपली महाविद्यालयीन शिक्षणाची इच्छा पूर्ण करून घेतली. आईच्या तालमीत वाढलेल्या माझ्या मुलांनी त्यांच्या प्रेमाने माझ्या जीवनाचे गोकुळ केले.

वारणानगरची १८ वर्षे हा आमच्या गृहस्थाश्रमाचा सुवर्णकाळ ठरला. आम्हा दोघांची अध्यापन सेवा, मुलांचे शालेय व महविद्यालयीन अध्ययन आणि त्यांच्या स्वतंत्र जीवनाची सुरवात या गोष्टींचा टप्पा पार करत, संसारसुखाने ओथंबून भरलेला पेला आस्वादत आम्ही निवृत्त झालो आणि आम्ही वारणानगर सोडले. कसा दृष्ट लागेल असा कालखंड होता तो. आम्ही निवृत्त झाल्यानंतर मुले आपापल्या ठिकाणी पांगली. चि. अभय व आमची लाडकी सून चि. सौ. तनुजा अमेरिकेत स्थायिक झाले; चि. सौ. सीमा विवाहानंतर बडोद्यात स्थायिक झाली व आम्ही दोघे शिराळयात माझ्या जन्मगावी आलो. जुने घर दुरूस्त करून तेथे राहू लागलो. शिराळा खरे तर आशाची सासुरवाडी, पण तिने आपल्या स्वभावाने व मुख्यतः आपल्या ज्ञानेश्वरीच्या पारायणाने भगिनीवर्गाचे एवढे प्रेम मिळवले की ती तिथली माहेरवाशीण झाली. सर्वांनी तिला 'माऊली' संबोधनाने आपलेसे केले. आजही आम्ही कधी शिराळयास गेलो तर सर्वजणी माऊली माऊली करत तिच्या भोवती गोळा होतात. शिराळयाची ४ वर्षे स्वप्नवत गेली. पण चि. अभयच्या आग्रहाखातर व सर्व मुलांशी संपर्क ठेवायला सोयिस्कर म्हणून आम्ही पुणे निवडले. अभय-तनुजानी आमच्यासाठी पुण्यात फ़्लॅट घेतला व आम्ही पुण्यात स्थलांतरित झालो. चि. अंजू, आमची धाकटी लेक सुरवातीच्या निवृत्तीच्या काळात ८ वर्षे आमच्याजवळच होती. १९९९ साली तीही तिच्या लेकीसह अमेरिकेत स्थायिक झाली. चि.अभयने आमचे पुण्यातील जीवन आरामदायक व्हावे म्हणून टीव्ही, फ्रीज़, फोन वगैरे सर्व सोयी करून दिल्या.

हे २०११ साल; आमच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या संपूर्ण काळात आशा सदैव माझ्याजवळ आपल्या प्रेमाची सावली धरून राहिली आहे. चि.सीमा आणि अभय यांच्या जन्माच्या वेळी ती माहेरी गेली तो ३/४ महिन्यांचा कालावधी सोडला तर मला सोडून ती फार क्वचित दूर राहिली आहे. सावलीसारखी ती सतत माझ्याजवळ आहे. हा जो तिचा सततचा प्रेमळ सहवास त्याची मला सवय जडली आहे. फिरायला जाताना, कोणालाही भेटायला जाताना, प्रवासाला कुठेही जाताना एकट्याने जाणे मला अजिबात आवडत नाही. मला ती सतत माझ्या जवळ हवी असते. व तीही मला एकटे सोडून कुठे जात नाही. मी अर्धविराम आहे तर ती पूर्णविराम आहे. ५० वर्षांचे तिचे हे अखंड, अतूट, अपरंपार प्रेम हे एखाद्या छत्राप्रमाणे माझ्या जीवनावर व्यापून राहिले आहे. तिच्या प्रेमात मातेची ममता आहे, पत्नीची प्रीति आहे, आणि मैत्रिणीची जिवलगता आहे. माझ्या दीर्घायुष्याची आणि माझ्या आरोग्याची खरी गुरुकिल्ली आहे हे माझ्या पत्नीचे माझ्यावरील निरंतर प्रेम आणि त्यामुळे माझे बोट सहजगत्याच तिच्याकडे झुकले. मुलांच्या माझ्यावरील प्रेमाचा स्रोत सुद्धा माझी पत्नी आहे. तिचे सहजानुकरण ते करतात. माझी पत्नी, माझी मुले [सून, जावई सुद्धा] व माझी सर्व नातवंडे माझ्यावर अपरंपार अहेतुक प्रेम करतात म्हणून मी दीर्घायुषी आहे, अजूनही

निरोगी आहे, कायम समाधानी व शांत म्हणून सुखी आहे. माझ्या सुखाचा सदरा माझ्याजवळच आहे.